## पुणे महानगरपालिका.
## सेवकवर्ग विभाग कार्यालय

सेवकवर्ग विभागाकडील कामकाज हे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९, मनपा सेवाविनियम, तसेच शासनाने वेळोवेळी प्रसृत केलेल्या आदेशानुसार चालते. सेवकवर्ग विभागाकडून सेवक भरती, सेवकांच्या सेवाजेष्ठता याद्या तयार करणे रोस्टर तयार करणे, बढती देणे, खात्यांतर्गत बदल्या करणे, तसेच लेखनिकी संवर्गातील खातेनिहाय लोअर/हायर डिपार्टमेन्टल परिक्षा घेणे इत्यादी कामे केली जातात.

पुणे महानगरपालिकेमधील एखाद्या संवर्गातील पदे रिक्त असतील अशा पदांकरिता प्रथमत: स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. तसेच सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवारांची नावे मगविण्यात येतात. त्यानुसार सदर पदांसाठी अर्ज विक्री ही घोले रोड, ढोले-पाटील रोड, कसबा पेठ व टिळक रोड ह्या विभागीय कार्यालयांकडून केली जाते. सदर जाहिरातीनुसार/सेवायोजन कार्यालयाकडून झालेल्या अर्जांची संबंधित खात्याकडून पात्र/अपात्र छाननी करण्यात येते. सदर छाननीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांच्या तांत्रिक स्वरुपाच्या पदांसाठी तांत्रिक परिक्षा व अतांत्रिक पदांबाबत लेखी परिक्षा घेण्यात येतात. तद्नंतर परिक्षेमध्ये गुणानुक्रमाने पात्र झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी सेवक निवड समितीपुढे मुलाखतीसाठी बोलविण्यात येते. मुलाखती अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची रिक्त पदे, मागासवर्गीय आरक्षण/अनुशेष, वेळोवेळी प्रसिध्द होणारे शासन आदेश इ. बाबी विचारात घेवून निवडयादी/प्रतिक्षायादी तयार करणेत येते. सदर निवड/प्रतिक्षायादीस संबंधित विषय समितीमार्फत मा.मनपा सभेची मान्यता घेण्यात येते. मा.मनपा सभेचे मान्यतेनंतर नेमणूकीबाबतची कार्यवाही करण्यात येते.

------०---------